**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. शिवाजी विठ्ठल काळे
राज्य गुन्हे अन्वेषण विभाग,
संगमब्रीज, शिवाजीनगर,
पुणे-५

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,**
परिमंडळ-१, फरासखाना पोलीस स्टेशन,
बुधवार पेठ, पुणे-२

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
डेक्कन विभाग, पौड फाटा पुलाजवळ,
कोथरुड, पुणे-३८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६५९/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९/०७/२००७ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८/०८/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ९/०९/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५/११/२००८ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** डेक्कन पोलीस स्टेशनच्या सक्षम अधिकाऱ्यांनी दाखल केलेल्या ठाणे दैनंदिनीची (स्टेशन-डायरी) छायाप्रत, तसेच सदर स्टेशन डायरीच्या प्रती कोणकोणत्या तारखेस प्राप्त झाल्या याबाबतची माहिती | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२५/०२/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. शिवाजी

विठ्ठल काळे हे अनुपस्थित होते. 'अपीलकर्ता श्री. काळे यांनी माहिती-मागणी अर्जान्वये मागणी केलेल्या पोलीस ठाणे दैनंदिनीमध्ये नमूद इतर गुन्हयांचा तपास चालू असून त्यांचे दोषारोपपत्र पाठविण्यात आलेले नाही. तसेच सदर दैनंदिनीतील अन्य गुन्हयांशी संबंधित महत्वाच्या नोंदी उघड झाल्यास संबंधित गुन्हयांच्या तपासावर त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. अपीलकर्त्याच्या मागणीमध्ये कोणतेही सार्वजनिक हित दिसून येत नाही. यास्तव माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८(१) (ड) (छ) (ज) अन्वये अपीलकर्त्यास माहिती नाकारण्यात आलेली आहे', असे अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, पुणे शहर यांनी दि. १५/११/२००८ च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास उत्तर दिले असून सदरचे उत्तर रास्त आहे. अपीलकर्त्यानी विशिष्ट प्रकरणातील माहिती नेमकेपणाने मागितल्यास जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, डेक्कन विभाग, यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदींच्या आधीन राहून कार्यवाही करणे आवश्यक आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**पुणे.**
**दि :-** 28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. सुनिलकुमार बावधनकर
चोपडे एजन्सीज अँड कन्सल्टसीज,
हिरामण लांडे बिल्डिंग, मुंबई-पुणे रोड,
कासारवाडी, पुणे-३४

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी,**
पंचायत समिती कोरेगांव,
जि.सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत तडवळे सं. वाघोली,
ता.कोरेगांव, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६६०/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३/०९/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ४/११/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४/०९/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सन १९८५ ते १९९० व २००७ ते ०८ या कालावधीमध्ये ग्रामपंचायतीस प्राप्त झालेले शासकीय अनुदान, विकास कामासाठी झालेला खर्च, श्री.धायगुडे ग्रामसेवक यांच्या शासकीय दैनंदिनीची छायाप्रत व अतिक्रमण करुन बांधलेल्या घरांचा तपशील | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. सुनिलकुमार बावधनकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन त्यांच्या माहिती-मागणी अर्जानुसार जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत तडवळे सं. वाघोली, ता.कोरेगाव, जि.सातारा यांनी दि.४/११/२००८ च्या

पत्रान्वये उत्तर दिलेले आहे. जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविल्यानुसार शुल्काचा भरणा करुन अपीलकर्त्याने माहिती आवश्यक तर प्राप्त करुन घ्यावी.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 28 MAY 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. काशिनाथ आनंदा खरात
द्वारा वृषाली मेडिकल दत्तनगर,
आंबेगाव रस्ता, आंबेगाव बुद्रुक,
पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा संचालक,**
यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ,
नाशिक, सेंटर-मामासाहेब मोहोळ महाविद्यालय,
४८/१-अ, पौड रोड, पुणे-३८

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,**
मामासाहेब मोहोळ महाविद्यालय,
४८/१-अ, पौड रोड, पुणे-३८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६६१/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७/०९/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३/१०/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२/११/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री. विजय काशिनाथ खरात बैठक क्र.O.P.१६००१४० या विद्यार्थ्याचे एम.लिब, आय.एस.सी. या परिक्षेचे अंतर्गत मूल्यमापनाचे गुण मिळणेबाबत | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२४/०२/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. काशिनाथ आनंदा खरात हे अनुपस्थित होते. अपीलकर्त्याने त्यांच्या माहिती-मागणी अर्जान्वये व्यक्तिशः माहिती मागविली होती. त्यानुसार अपीलकर्त्यास दि. १३/१०/२००८ च्या पत्रान्वये महाविद्यालयात माहिती घेण्यास आले होते. तथापि ते महाविद्यालयात उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे त्यांना महाविद्यालयाचे पत्र जावक क्र.६२३/२००८-०९ दि.१/१२/२००८ च्या पत्रान्वये रजिस्टर पोस्टाने माहिती पाठविण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, पौड रोड, पुणे-३८ यांचे प्रतिनिधी श्री. एन.डी.इंगळे, प्रभारी संचालक व अपिलीय प्राधिकारी तथा संचालक, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक, सेंटर-मामासाहेब मोहोळ विद्यालय, श्री. एम.आर.अवघडे संयोजक यांनी पोस्टाच्या पावतीसह व पाठविण्यात आलेल्या माहितीच्या प्रतीसह प्रपत्रात नमूद केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 28 MAY 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. रामेश्वर पाटीलबा नागरे
मु.पो.दोंदे, ता.खेड,
जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.),**
जिल्हा परिषद पुणे,
पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
मामासाहेब मोहोळ बहुउद्देशीय प्रशाला,
वाशेरे, ता.खेड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७२२/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९/०९/२००८ |
| ३ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सर्वश्री. बोरडे, नेहरे, जमादार, दौंड, सोनवणे, रौंधळ, गांगुडे या शिक्षकांच्या सेवापुस्तकांच्या छायाप्रती, त्यांचे नेमणुकीचे आदेश, रुजू अहवाल, हजेरीपत्रक तदनुषंगिक माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. रामेश्वर पाटीलबा नागरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. तरीही राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२४/०२/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. अपीलकर्ता श्री.नागरे यांना त्यांच्या मागणीनुसार कागदपत्रांच्या प्रती आठ दिवसांत देण्यात येतील, असे जन माहिती अधिकारी तथा

मुख्याध्यापक, मामासाहेब मोहोळ बहुउद्देशीय प्रशाला, श्री.एच.बी.लोंढे व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद पुणे, पुणे-१ यांनी प्रपत्रात नमूद केले होते. त्यानुसार अपीलकर्त्यास त्यांच्या मागणीप्रमाणे सर्व कागदपत्रे दिलेली आहेत असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मामासाहेब मोहोळ बहुउद्देशीय प्रशाला, वाशेरे, यांनी दि.१८/०४/२००९ च्या पत्रान्वये आयोगास कळविले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 28 MAY 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. बी.एस.दिवेकर
एन-१२, मंत्री मार्केट, हडपसर,
पुणे-२८

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा विशेष भूमी संपादन अधिकारी,**
पुणे नं.६, जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन,**
विशेष भूमी संपादन अधिकारी नं.६,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७२४/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४/०९/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०/१०/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७/११/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६/१२/२००८ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-**<br>१) वीर बाजी पासलकर प्रकल्पासाठी श्री.गोविंद भिका पडवळ, श्रीमती सिंधू नथू पडवळ, श्री.नथू बाळा पासलकर, श्री. नामदेव सोमा क्षिरसागर रा.मौजे भोयनी यांची कोणत्या गटातील किती जमीन संपादन करण्यात आली याबाबतची माहिती<br>२) चासकमान प्रकल्पासाठी श्री. गोविंद महादू बोराडे यांचे संपादन केलेले क्षेत्र व गट नं. इ. तपशील | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२६/०५/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमांत' सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री.बी.एस.दिवेकर हे अनुपस्थित होते. 'अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती-मागणी अर्जानुसार पोस्टाचा दाखला घेऊन माहिती देण्यात आलेली आहे. तसेच त्यांच्या अर्जातील दुरुस्तीनंतर त्यांना समक्ष संचिका दाखवून माहिती देण्यात आली', असे जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन, विशेष भूमी संपादन अधिकारी नं.६, पुणे श्री.आर.जी.जगताप यांनी पूरक कागदपत्रांसह प्रपत्रात नमूद केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- 28 MAY 2010**

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. संदीप प्रभाकर इथापे
येरवडा जेल क्वार्टर्स,
रुम.नं.११५, येरवडा,
पुणे-६

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य,**
दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय,
येरवडा, पुणे-६

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा तुरुंग अधिकारी श्रेणी-१,**
दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय,
येरवडा, पुणे-६

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८५७/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४/११/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५/१२/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १९/१२/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सन १९९९ पासून महाविद्यालयात प्रशिक्षणादरम्यान शिस्तभंग केल्याने परत पाठविण्यात आलेल्या विद्यार्थी कर्मचाऱ्यांच्या आदेशांच्या छायाप्रती, त्यांच्यावर केलेल्या कारवाईबाबतच्या कागदपत्रांच्या छायाप्रती, अशा विद्यार्थी कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण केव्हा पूर्ण झाले त्याबाबतचा तपशील व प्रमाणपत्रांच्या छायाप्रती, प्रशिक्षणादरम्यान पुस्तकांसह व पुस्तकाविना लेखी परीक्षा देण्यासंदर्भातील निर्णयाच्या प्रती | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.४/०४/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. 'अपीलकर्ता श्री. संदीप प्रभाकर इथापे यांना त्यांच्या माहिती-मागणी अर्जाच्या अनुषंगाने माहितीसाठीचे शुल्क रु.२४/- चा भरणा करण्याबाबत मुदतीत कळविण्यात आले होते. तथापि अपीलकर्त्याने शुल्क भरणा न केल्यामुळे त्यांना माहिती देण्यात आली नाही', असे जन माहिती अधिकारी तथा तुरुंग अधिकारी श्रेणी-१, दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय, येरवडा, पुणे श्री.अ.स.जगताप व अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य, दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय, पुणे श्री.जयंत नाईक यांनी प्रपत्रात नमूद केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 28 MAY 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. दीपक मनोहर देशपांडे
श्रमगड हौसिंग सोसायटी-अे,
फ्लॅट नं.३, आण्णासाहेब मगर स्टेडियमसमोर,
उद्यमनगर, नेहरुनगर, पिंपरी,
पुणे-१८

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
भोर उपविभाग, जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार,**
उपविभागीय अधिकारी कार्यालय, भोर उपविभाग,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८७६/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०/१०/२००८, १७/०१/२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९/०१/२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८/११/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ९/०१/२००९ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मौजे कुरण बुद्रुक, ता.वेल्हे, जि.पुणे येथील मिळकती मध्ये हक्क नोंद करताना उपविभागीय अधिकारी, भोर यांनी आर.टी.एस. अपील क्र.४६/२००७ मध्ये दि.३०/०६/२००८ रोजी निर्णय देताना आधारभूत धरलेली कागदपत्रे, अधिनियमातील तरतुदी आणि उपविभागीय अधिकारी, भोर यांचे निष्कर्ष | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.१५/०७/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. 'अपीलकर्ता श्री. दीपक मनोहर देशपांडे यांच्या माहिती-मागणी अर्जाच्या अनुषंगाने त्यांना मुदतीमध्ये उत्तर दिले', असे जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, भोर उपविभाग, जि.पुणे श्री. बी.व्ही.गव्हाणे व अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, भोर उपविभाग, जि.पुणे श्रीमती वैशाली इंदानी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. 'अर्जदाराने मागणी केलेल्या कागदपत्रांसाठी रु.४०/- चा भरणा केल्यानंतर अर्जदारास कागदपत्रांच्या छायाप्रती देण्यात आलेल्या आहेत. तसेच 'माहितीच्या अधिकारात फक्त उपलब्ध कागदपत्रे पुरविण्याची तरतूद आहे. मत प्रदर्शित करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. आपण संचिका पाहून आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची मागणी करावी, असे अपीलकर्त्यास कळवून देखील त्यांनी कागदपत्रांची मागणी केलेली नाही', असे जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, जिल्हाधिकारी कार्यालय आवार पुणे यांनी दि.१५/०७/२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 28 MAY 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. राजेंद्र विष्णू सावंत
मु.पो. कुरवली, ता. इंदापूर, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, करमाळा,
ता. करमाळा, जि. सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, करमाळा,
ता. करमाळा, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८९७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २८.५.२०१० |
| ३ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.१२.२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३.१.२००९ |
| ५ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि. १८.३.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने दि.२८.५.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीस अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे उपस्थित नव्हते.

आपल्या आईने पुनर्वसन गावठाणात भूखंड मिळण्याबाबत केलेल्या अर्जावर जिल्हा पुनर्वसन अधिकारी, सोलापूर यांनी कळविल्यानुसार तहसीलदार, करमाळा कार्यालयाने कार्यवाही केली नाही. कार्यवाही करून अहवाल सादर करून प्रत मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. राजेंद्र विष्णू सावंत यांनी केली आहे. मंडल अधिकारी, केत्तूर यांच्याकडून अहवाल प्राप्त करून घेऊन अपीलकर्त्यास द्यावा, असे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, करमाळा व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, करमाळा यांच्या चर्चेत ठरले. तहसीलदार, करमाळा यांनी दि. २३.३.२००९ रोजी जिल्हा पुनर्वसन अधिकारी, सोलापूर यांना अहवाल सादर केला, व अपीलकर्त्यास त्यानुसार माहिती दिली, असे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. त्याचा विचार करता अपीलकर्त्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. 29 MAY 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.महंमद फारूक महंमदहुसेन कमिशनर
१३०/२५, सिध्देश्वर पेठ, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक, महाविद्यालये विद्यापीठ
विकास महामंडळ, सोलापूर — उत्तरवादी

(१)**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
सोलापूर सोशल असोसिएशन कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर
(२)**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी,
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर श्री.दशरथ महादेव वलेकर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक, महाविद्यालये विद्यापीठ
विकास महामंडळ, सोलापूर श्री.राजेंद्र नारायण शेंडगे

(२)**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी,
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर श्री.दशरथ महादेव वलेकर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.४.८.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.६.८.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२.१२.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१९.१२.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.महंमद फारूक महंमद हुसेन कमिशनर यांनी सोलापूर असोसिएशन कॉलेज ऑफ एज्युकेशन यांच्या संदर्भातील माहिती मागितली होती. माहिती महाविद्यालयाच्या संदर्भातील असल्यामुळे अर्ज त्यांच्याकडे वर्ग केला. विनाअनुदानित महाविद्यालय असून मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रीट याचिका क्र.५१३२ / २००८ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार विनाअनुदानित महाविद्यालयांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असे निवेदन महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या वतीने करण्यात आले, असे जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर श्री.दशरथ महादेव वलेकर व अपिलीय प्राधिकारी तथा संचालक, महाविद्यालय विद्यापीठ विकास महामंडळ, सोलापूर श्री.राजेंद्र नारायण शेंडगे यांनी नमूद केले. अपिलीय प्राधिकारी तथा संचालक, महाविद्यालय विद्यापीठ विकास महामंडळ, सोलापूर यांनी या संदर्भात दिलेला निर्णय योग्य असून कायम करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
2 4 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. शांताराम महादेव कुंजीर
प्रताप हाईटस्, स.नं.४०,
केशवनगर, मुंढवा,
पुणे-३६

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,**
मुख्यालय-१,
पोलीस आयुक्त कार्यालय,
पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन),**
परवाना विभाग, पोलीस आयुक्त कार्यालय,
पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२०/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२५/०५/२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन),**<br>परवाना विभाग, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे<br>श्री.जे.आर.देशमुख<br>**अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,**<br>मुख्यालय-१, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे-१<br>यांचे प्रतिनिधी श्री.ए.एम.बिराजदार | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३/०८/२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४/०८/२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५/१०/२००९ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २४/०२/२०१० |
| ८ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** हॉटेल साईसागर, वानवडी, पुणे पोलीस परवाना, पार्किंग नकाशा, वाहतूक विभाग, अग्निशामक दल यांनी दिलेल्या या हॉटेलच्या नाहरकत प्रमाणपत्रांच्या छायाप्रती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. शांताराम महादेव कुंजीर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.२५/०५/२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. 'माझ्या माहिती-मागणी अर्जानुसार मला दि.२६/०२/२०१० रोजी माहिती प्राप्त झाली असून सदरचे माझे अपील रद्द व्हावे', असा अपीलकर्ते श्री कुंजीर यांचा दि.२५/०५/२०१० रोजीचा जबाब जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-** 28 MAY 2010

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. नामदेव गोविंद घावटे
सय्यदबाबानगर झोपडपट्टी,
ता.शिरुर, जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी,**
शिरुर नगरपरिषद, घोडनदी,
जि.पणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
शिरुर नगरपारिषद (बांधकाम विभाग),
घोडनदी, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२६/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २६/०५/२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी**<br>शिरुर नगरपारिषद (बांधकाम विभाग),<br>घोडनदी, जि.पुणे<br>श्री.राजेंद्र वाघमारे, ओव्हरसीयर<br>**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी,**<br>शिरुर परिषद, घोडनदी, जि.पणे<br>श्री.पांडुरंग महालेकर | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३/०८/२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२/०९/२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५/०९/२००८ |

| | |
|---|---|
| ७ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** शिरुर नगरपारिषेदच्या बांधकाम विभागात सन २००४ पासून काम करणारे कर्मचारी, त्यांची शैक्षणिक पात्रता, त्यांना नेमून दिलेली कामे तदनुषंगीक एकूण ३४ मुद्दयांची विस्तृत माहिती |

## विवेचन

'मी शिरुर नगरपरिषदेकडे मागितलेली माहिती मला दि. ६/०२/२००९ रोजी समक्ष मिळाली आहे. त्याबाबत माझी कसल्याही प्रकारची तक्रार नाही. त्यामुळे मी केलेला अपील अर्ज निकाली काढण्यात यावा,' असे अपीलकर्ता श्री. नामदेव गोविंद घावटे यांचे दि.२५/०५/२०१० रोजीचे निवेदन जन माहिती अधिकारी शिरुर नगरपारिषद (बांधकाम विभाग), घोडनदी, जि.पुणे श्री.राजेंद्र वाघमारे, ओव्हरसीयर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 26 MAY 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रमेश बापूराव पाटील
मु.पो.श्रीपूर, ता.माळशिरस, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, श्री चंद्रशेखर विद्यालय व
नारायणकाका आगाशे कनिष्ठ महाविद्यालय, श्रीपूर,
ता.माळशिरस, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३४० / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रमेश बापूराव पाटील
मु.पो.श्रीपूर, ता.माळशिरस, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एम.एन.वीर

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, श्री चंद्रशेखर विद्यालय व नारायणकाका आगाशे कनिष्ठ महाविद्यालय, श्रीपूर, ता.माळशिरस, जि.सोलापूर श्री.बी.एच.जाधव

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२२.७.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२४.८.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.३.११.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री चंद्रशेखर विद्यालय व नारायणकाका आगाशे कनिष्ठ महाविद्यालय, श्रीपूर, ता.माळशिरस, जि.सोलापूर यांनी माहिती दिली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्या आदेशानंतरही त्यांनी माहिती देण्याची कार्यवाही केली नाही व दिलेली माहिती अपुरी आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.रमेश बापूराव पाटील यांनी केली.

जून-२००७ पासून श्री.पाटील यानी त्याच स्वरूपाच्या माहिती-मागणीचे २५ अर्ज केले आहेत. वेळोवेळी त्यांना माहिती देण्यात आली आहे. त्यावर त्यांनी केलेल्या अपिलांची सुनावणीही अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी घेतली आहे. माहिती अपुरी असल्याची तक्रार ते सातत्याने करीत असतात. समक्ष येऊन कागदपत्रांचे अवलोकन करून माहिती घेण्यास सांगितली असता ते येत नाहीत. त्यामुळे त्यांना माहिती देण्याच्या एकाच कामासाठी बराच वेळ खर्ची घालावा लागतो व कर्मचाऱ्यांवर ताण वाढतो, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री चंद्रशेखर विद्यालय व नारायणकाका आगाशे कनिष्ठ महाविद्यालय, श्रीपूर, ता.माळशिरस, जि.सोलापूर श्री.बी.एच.जाधव यांनी केले.

संस्थेकडे व विविध पातळ्यांवर श्री.पाटील त्याच मुद्दयांवर अर्ज व अपिले करीत असतात. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री चंद्रशेखर विद्यालय व नारायणकाका आगाशे कनिष्ठ महाविद्यालय, श्रीपूर, ता.माळशिरस, जि.सोलापूर यांच्याकडे केलेल्या प्रत्येक अर्जावर अपील करतात. मुद्दयांमध्ये थोडाफार तांत्रिक फरक करून पुनः पुन्हा अर्ज व अपिले करतात. त्यामुळे सर्वच यंत्रणांचा वेळ नाहक वाया जातो, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एम.एन.वीर यांनी केले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सादर केलेली पूरक कागदपत्रे विचारात घेता त्यांचे प्रतिपादन रास्त असल्याचे स्पष्ट होते. अपीलकर्त्याची ही कृती योग्य नाही. अपीलकर्ता श्री.पाटील यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री चंद्रशेखर विद्यालय व नारायणकाका आगाशे कनिष्ठ महाविद्यालय, श्रीपूर, ता.माळशिरस, जि.सोलापूर यांच्या कार्यालयात जाऊन माहिती-मागणीशी संबंधित सर्व संचिकांचे अवलोकन करावे व हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क भरून प्राप्त करून घ्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
24 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मज़ला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. तुकाराम रामण्णा डोळळी
मु.पो.अंकलगी, ता.जत,
जि.सांगली

अपीलकर्ता

**विरुध्द**

**१) अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,**
तथा प्रकल्प संचालक, जलस्वराज्य प्रकल्प,
जिल्हा परिषद सांगली

**२) अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी,**
पंचायत समिती जत, जि.सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत अंकलगी,
ता.जत, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३७४/सांगली + ३७५/सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७/१२/२००६ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५/०५/२००७ |
| ३ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०/११/२००७ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मौजे अंकलगी, ता.जत येथे कार्यन्वीत करण्यात येत असणाऱ्या जलस्वराज्य प्रकल्पाबाबतच्या माहितीचे एकूण २७ मुद्दे | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. तुकाराम रामण्णा डोळळी यांनी एकाच माहिती-मागणी अर्जाच्या अनुषंगाने आयोगाकडे दोन अपिले केलेली आहेत. सदर अपिलांवर दि.२९/०४/२००९ रोजी सुनावणी मुक्रर

करण्यात आली होती तथापि 'मी मागणी केलेली माहिती यापूर्वीच मिळालेली असल्याने आयोगाने आयोजित केलेल्या सुनावणीस उपस्थित राहू शकत नाही. अपील निकाली काढावे;' असे अपीलकर्त्याचे दि.१६/०९/२००९ रोजीचे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी ग्रामसेवक, ग्रामपंचायत अंकलगी, ता.जत, जि.सांगली यांनी दि. १६/०९/२००९ रोजीच्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

दोन्ही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 21 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सदाशिव दत्तात्रय पाटील
कोथळी, ता.करवीर, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४४६ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.११.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सदाशिव दत्तात्रय पाटील
कोथळी, ता.करवीर, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर
प्रतिनिधी श्री.एस.टी.भोसले

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.२.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१८.३.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## सुधारित आदेश

राज्य माहिती आयोगाकडील समक्रमांकाच्या अपिलातील दि.१५.३.२०१० रोजी झालेल्या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालुका करवीर, जि.कोल्हापूर श्री.एस.एस.सिंगतकर यांना रूपये २५०००/- शास्ती करण्यात आली होती.

श्री.सुनिल सिंगतकर यांनी दि.५.५.२०१० रोजी आयोगाला पुरक कागदपत्रांसह समक्ष खुलासा सादर करून शास्ती रद्द करण्याची विनंती केली होती.

श्री.सिंगतकर यांनी दिलेला अर्ज व सोबतची कागदपत्रे पाहता त्यांनी अपीलकर्ता यांना दि.१९.११.२००९ च्या पत्राने माहिती देऊन आयोगाने केलेल्या मौखिक आदेशाचे पालन केले असल्याचे दिसून येते. तसेच त्यांनी त्याबाबतचा अहवालही राज्य माहिती आयोगाला त्याच दिवशी दि.१९.११.२०१० रोजी पाठविल्याचे व त्याची नोंद राज्य माहिती आयोगाच्या आवक बारनिशीला होऊन संबंधित सहाय्यक श्री.एस.जे.वैरागी यांना दिल्याचे व तशी त्यांची संबंधित आवक लिपिकाने स्वाक्षरी घेतल्याचे दिसून आले आहे.

यामध्ये संबंधित सहाय्यक श्री.वैरागी यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालुका करवीर, जि.कोल्हापूर श्री.एस.एस.सिंगतकर यांनी आयोगाला सादर केलेला खुलासा अपिलाच्या संचिकेला न लावल्यामुळे, पर्यायाने सदर खुलासा आयोगाच्या समोर न आल्याने, श्री.सिंगतकर यांना शास्ती झालेली आहे, असे आयोगाच्या निदर्शनास आले आहे. सदर कसुरीबद्दल संबंधित सहाय्यक यांचा खुलासा घेऊन पुढील कार्यवाही उपसचीव, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे यांनी करणे आवश्यक आहे.

सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालुका करवीर, जि.कोल्हापूर श्री.एस.एस.सिंगतकर यांनी पूरक कागदपत्रांसह केलेला खुलासा विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालुका करवीर, जि.कोल्हापूर श्री.एस.एस.सिंगतकर यांचा पुनर्विलोकन अर्ज मान्य करण्यात येत असून त्यांना दि.१५.३.२०१० च्या आयोगाच्या आदेशान्वये करण्यात आलेली शास्ती रूपये २५०००/- रद्द करण्यात येत आहे.

(२) श्री.एस.जे.वैरागी, सहाय्यक, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ कार्यालय, पुणे यांचा त्यांचयावर कारवाई का करू नये, याबाबतचा खुलासा उपसचीव, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे यांनी दि.१.६.२०१० पर्यंत मागवून प्रस्तावित कार्यवाहीस आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि.१४.५.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. नारायण वासुदेव लंगडे
एफ १३, शिवशक्ती बिल्डिंग,
सिताराम नगर, मराठा समाज मार्ग मागे,
आंबेडकर रोड, सांगली-१६

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त,**
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४५१/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९/४/२००९ |
| ३ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**<br>सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका,<br>सांगली<br>श्री. रमेश वाघमारे<br>**अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त,**<br>सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली<br>यांचे प्रतिनिधी श्री. रमेश वाघमारे | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३/०५/२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९/०६/२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६/०७/२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६/०८/२००७ |
| ८ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** बांधकाम परवाना, मंजूरी व प्रारंभ पत्राबाबतची माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. नारायण वासुदेव लंगडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.२९/०४/२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता श्री. नारायण वासुदेव लंगडे यांचे दि.३/०३/२००८ रोजी निधन झाले असल्याचे दि.२५/०५/२०१० रोजीचे प्रमाणपत्र जन्म-मृत्यू उपनिबंधक, सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांनी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 24 MAY 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.